आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ जानेवारी २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला प्रधानमंत्र्यांकडून हिरवा झेंडा; ३ हजार २५० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते पायाभूत प्रकल्पांचं उद्घाटन

- दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा परिषद निवडणुकाही एकत्रित लढवणार असल्याची शशीकांत शिंदे यांची माहिती

- राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीत १ हजार ४२५ जागा जिंकून भाजपा सर्वात मोठा पक्ष, शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर, काँग्रेस आणि एमआयएमचीही दमदार कामगिरी

- **आणि**
- महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये यु पी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स सामना आज रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात विकासकामांना वेग देणाऱ्या ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं आज उदघाटन केलं.

मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेलाही आज दुरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला. शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार

आहे. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. याप्रसंगी प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

राष्ट्रीय महामार्गाच्या धुपगुरी-फलकाता दरम्यान चौपदरीकरणाचं भूमिपूजनही मोदी यांनी यावेळी केलं. यामुळे, उत्तर बंगालमधील प्रादेशिक दळण वळणाला चालना मिळणार आहे.

प्रधानमंत्री आज संध्याकाळी आसामला भेट देणार असून आपल्या दोन दिवसांच्या दौऱ्यात ते विकास प्रकल्पाचं भूमिपूजन करणार असून दोन नवीन अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. गुवाहाटी इथं बोडो जमातीतल्या १० हजार नर्तकांसह सादर होणार असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला मोदी आज संध्याकाळी उपस्थित राहणार आहेत. नागाव जिल्ह्यात कालियाबोर इथं काझीरंगा एलिव्हेटेड अर्थात जमिनीपासून उंचावरून जाणाऱ्या वन्यजीव कॉरिडॉरचं प्रधानमंत्री उद्या सकाळी भूमिपूजन करणार आहेत. यामुळे वन्यजीवांच्या हालचालींमध्ये येणारा अडथळा टाळून मानव-वन्यजीव संघर्ष आटोक्यात आणणं शक्य होणार आहे. त्यानंतर, प्रधानमंत्री कामाख्या-रोहतक अमृत भारत एक्सप्रेस तसंच दिब्रुगड-गोमती नगर अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवतील.

**<><><><><>**

हज यात्रेला जाण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर मात्र वेळ वाढून दिली जाणार नाही, त्यामुळं हज यात्रेला जाऊ इच्छिणाऱ्यांनी त्यासाठीचं आरक्षण आणि इतर कागदपत्रं वेळेतपूर्ण करावीत, असं अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

पुणे महानगरपालिकेतल्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे दोन्ही पक्ष पुन्हा एकदा आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रितपणे लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काल पुण्यात ही माहिती दिली. शशिकांत शिंदे यांनी बारामती इथं शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, जयंत पाटील आणि इतर नेते उपस्थित होते, अशी माहिती त्यांनी दिली. महानगरपालिका निवडणुकीतील पराभवाचं आत्मचिंतन करून दोन्ही पक्ष नव्या दमानं पुढे जातील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल मतमोजणी झाल्यावर रात्री उशिरा अंतिम निकाल आले. या निकालांनुसार भारतीय जनता पक्षानं १ हजार ४२५ जागा जिंकून राज्यात वर्चस्व गाजवलं आहे. शिवसेनेनं ३९९, काँग्रेसनं ३२४, राष्ट्रवादी काँग्रेसनं १६७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं १५५, एमआयएमनं ११३, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ३६, मनसेनं १३ आणि बसपानं ६ जागा जिंकल्या आहेत.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेत** भाजपा आणि शिवसेना महायुतीनं बहुमताचा आकडा गाठत निर्णायक विजय मिळवला. भाजपानं ८९ जागांवर तर शिवसेना २९ जागांवर विजयी झाली आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ६५ जागांवर तर मनसेला ६ जागांवर यश मिळालं. काँग्रेसनं २४ जागा जिंकल्या, तर एमआयएमनं ८, राष्ट्रवादी काँग्रेसनं ३, समाजवादी पक्षानं २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावं लागलं.

राज्यातल्या इतर महानगरपालिकांमधली स्थिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून….

**-------------व्हीसी--------------**

***पुण्यात*** *भाजपनं ११९ जागा जिंकून सत्ता काबीज केली. अजित पवार यांच्या नेतृत्वातली राष्ट्रवादी काँग्रेस २७ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ३ आणि काँग्रेसनं १५ जागा मिळवल्या आहेत.*

***पिंपरी-चिंचवडमध्ये*** *भाजपनं ८४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ३७ जागा जिंकल्या.*

***नागपूर*** *महानगरपालिकेच्या १५१ जागांपैकी भाजपनं १०२ तर काँग्रेसनं ३४ जागा जिंकल्या.*

***नाशिकमध्ये*** *भाजपानं ७२, शिवसेनेनं २६, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं १५, काँग्रेसनं ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ४ जागांवर विजय मिळवला.*

***छत्रपती संभाजीनगरमध्ये*** *भाजपनं ५७, एमआयएमनं ३३, शिवसेनेनं १३ आणि काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला.*

***ठाण्यात*** *१३१ जागांपैकी शिवसेनेनं ७५, भाजपनं २८, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ९ जागा जिंकल्या आहेत.*

***कल्याण-डोंबिवलीत*** *१२२ जागांपैकी शिवसेनेनं ५३, भाजपनं ५०, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ११ आणि मनसेनं ५ जागांवर विजय मिळवला.*

***नवी मुंबईत*** *१११ जागांपैकी भाजपनं ६५ जागा जिंकत बहुमत मिळवलं, तर शिवसेनेनं ४२ जागा जिंकल्या आहेत.*

***मिरा-भाईंदरमध्ये*** *९५ जागांपैकी भाजपनं ७८ जागा जिंकत पालिकेत सत्ता मिळवली, तर काँग्रेसनं १३ जागांवर विजय मिळवला.*

***वसई-विरारमध्ये*** *११५ जागांपैकी बहुजन विकास आघाडीनं ७१ जागा जिंकून आपलं वर्चस्व राखलं आहे, तर भाजपला ४३ जागा मिळाल्या आहेत.*

***पनवेलमध्ये*** *७८ जागांपैकी ५५ जागा जिंकत भाजपनं पालिका ताब्यात घेतली आहे; इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ५ आणि काँग्रेसनं ४ जागा जिंकल्या आहेत.*

***जळगावमध्ये*** *७५ जागांपैकी भाजपनं ४६, शिवसेनेनं २२ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ५ जागांवर विजय मिळवला.*

***धुळ्यात*** *७४ जागांपैकी भाजपनं ५०, एमआयएमनं १० आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ८ जागा जिंकल्या आहेत.*

***अहिल्यानगरमध्ये*** *६८ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसनं २७, भाजपनं २५ आणि शिवसेनेनं १० जागांवर विजय मिळवला.*

***मालेगावमध्ये*** *८४ जागांपैकी इस्लाम पक्षानं सर्वाधिक ३५ जागा तर एमआयएमनं २१ आणि शिवसेनेनं १८ जागा जिंकल्या. इथं भाजपाला केवळ २, समाजवादी पार्टीला ५ तर, काँग्रेसला ३ जागा मिळाल्या.*

***सोलापूरमध्ये*** *१०२ जागांपैकी भाजपनं ८७ आणि एमआयएम पक्षानं ८ जागांसह यश मिळवलं आहे.*

***कोल्हापूरमध्ये*** *८१ जागांपैकी काँग्रेस ३४ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला, तर भाजपनं २६ आणि शिवसेनेनं १५ जागांवर विजय मिळवला.*

***सांगली-मिरज-कुपवाडमध्ये*** *७८ जागांपैकी भाजपनं ३९, काँग्रेसनं १८ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं १६ जागा जिंकल्या आहेत.*

***लातूरमध्ये*** *७० जागांपैकी ४३ जागा जिंकून काँग्रेसनं पालिका आपल्या ताब्यात घेतली; इथं भाजपनं २२ आणि वंचित बहुजन आघाडीनं ४ जागांवर विजय मिळवला.*

***नांदेड-वाघळामध्ये*** *८१ जागांपैकी भाजपनं ४५, एमआयएम पक्षानं १४ आणि काँग्रेसनं १० जागा जिंकल्या आहेत.*

***अमरावतीत*** *८७ जागांपैकी भाजपनं २५, एमआयएमनं ११, युवा स्वाभिमान पक्षानं १६ आणि काँग्रेसनं १५ जागांवर विजय मिळवला.*

***अकोल्यात*** *८० जागांपैकी भाजपनं ३८, काँग्रेसनं २१ आणि वंचित बहुजन आघाडीनं ९ जागा जिंकल्या आहेत.*

***चंद्रपूरमध्ये*** *६६ जागांपैकी काँग्रेसनं २७ आणि भाजपनं २३ जागांवर विजय मिळवला.*

***परभणीत*** *६५ जागांपैकी २५ जागा जिंकत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला; इथं राष्ट्रवादी काँग्रेसनं ११, भाजपनं १२ आणि काँग्रेसनं १२ जागा जिंकल्या आहेत.*

***जालन्यात*** *६५ जागांपैकी भाजपनं ४१ आणि शिवसेनेनं १२ जागांवर विजय मिळवला.*

***इचलकरंजीमध्ये*** *६५ जागांपैकी भाजपनं ४३ आणि राजर्षी शाहू विकास आघाडीनं १७ जागा जिंकल्या आहेत.*

**<><><><><>**

मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थानं बांधायला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. तसंच, शिवडी न्हावाशेवा अटल सेतूच्या टोलशुल्काला आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. मुंबईत नागरी परिवहन प्रकल्प टप्पा दोनसाठीच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्यात आली.

राज्यातल्या युवकांना परदेशात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था स्थापन करायलाही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

भाजीपाला निर्यातीकरता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव इथे मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी पणन महामंडळाला ७ हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे.

<><><><><>

आकाशवाणीच्या वृत्त विभागातल्या माजी वृत्त निवेदिका जयश्री पाटणकर यांचं काल मुंबईत हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. सुरुवातीला राज्य सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क कार्यालयात काम केल्यानंतर दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या वृत्तविभागात त्यांनी जवळपास तीन दशकांहून अधिक काम केलं होतं.

<><><><><>

महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये आज दोन सामने होणार असून यु पी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स सामना सुरू आहे. यात मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा युपीच्या दुसऱ्या षटकात १ बाद ११ धावा झाल्या होत्या.

दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातला सामना संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

<><><><><>

धनगर समुदायाचा समावेश अनुसूचित जमातीत करायच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यात होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

करण्यात आले आहेत. इथलं जनजीवन सुरळीत सुरू आहे. चौकाचौकात बोलीस बंदोबस्त लागू करण्यात आला आहे. धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान म्हणजेच उमेद अंतर्गत महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू तसंच खाद्य पदार्थांचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी सरस आणि वऱ्हाडी जत्रा वाशिम जिल्ह्यात सुरु आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभोजकर यांनी काल सरस तसंच वऱ्हाडी यात्रेचं उद्घाटन केलं. हे प्रदर्शन उद्यापर्यंत असेल. उमेद अभियानामुळे प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होऊन आर्थिक सक्षमतेस हातभार लागल्याबद्दल बचत गटांच्या महिलांनी समाधान व्यक्त केले.

<><><><>

भंडारा जिल्ह्यातच्या तुमसर तालुक्यातल्या मोहगाव इथं जिल्हा परिदेच्या पूर्व माध्यमिक शाळेत पटसंख्येच्या प्रमाणात शिक्षक नसल्यामुळे शिक्षक येईपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेत पाठवणार नाही अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे. या शाळेची पटसंख्या ८२ असून तीन शिक्षक आहेत. याबाबत पालकांनी वारंवार शिक्षण विभागाला निवेदन देऊनही शिक्षण विभागाने दखल न घेतल्याने पालकांनी हा पवित्रा घेतला आहे.

//<><><><>//